*Research Journal of Language, Literature and Humanities* ISSN 2348-6252
Vol. **13(3),** 1-4, September **(2026)** *Res. J. Lang. Lit. Humanities*

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वित्तीय साक्षरतेच्या परिप्रेक्ष्यात अनुसूचित जातीची स्थिती, महाराष्ट्र, भारत

कोल्हे पृथ्वीराज भीमराव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत
kolhepruthviraj@gmail.com

**Available online at: www.isca.in, www.isca.me**
Received 12th May 2026, revised 25th June 2026, accepted 26th July 2026

## सारांश

*हा अभ्यास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनुसूचित जातींमधील आर्थिक साक्षरतेची स्थिती तपासतो. हा जिल्हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिकदृष्ट्या विकसित असला तरी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये आर्थिक जागरूकतेचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो.या अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला असून, ३६० प्रतिसादकर्त्यांकडून संरचित प्रश्नावलीद्वारे प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली. अभ्यासातील निष्कर्षानुसार काही प्रतिसादकर्त्यांना उत्पन्न नियोजन आणि खर्च व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत आर्थिक संकल्पनांची माहिती आहे. मात्र गुंतवणूक, विमा, डिजिटल वित्तीय व्यवहार आणि बँकिंग नियम यांसारख्या प्रगत बाबींविषयी जागरूकता मर्यादित आहे. अनेक प्रतिसादकर्त्यांना भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) आणि तिच्या धोरणांविषयी स्पष्ट माहिती नाही. आर्थिक माहिती मिळवण्यासाठी अनेक जण बँका आणि शैक्षणिक संस्थांवर अवलंबून आहेत, परंतु अजूनही काही लोक अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत किंवा त्यांना पुरेशी माहिती नाही. अभ्यासात योग्य आर्थिक शिक्षणाचा अभाव, विश्वासार्ह माहितीपर्यंत मर्यादित पोहोच, डिजिटल अशिक्षितपणा आणि सामाजिक-सांस्कृतिक अडथळे यांसारख्या प्रमुख समस्या देखील समोर आल्या आहेत. या घटकांचा आर्थिक निर्णयक्षमता, बचतीची सवय आणि एकूण आर्थिक प्रगतीवर थेट परिणाम होतो.अभ्यासाच्या निष्कर्षानुसार आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग, बँकांकडून जनजागृती मोहिमा, डिजिटल आणि सामाजिक माध्यमांचा वापर तसेच सरकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक असल्याचे सुचवण्यात आले आहे. एकूणच, आर्थिक साक्षरतेत सुधारणा करणे हे आर्थिक समावेशन वाढवण्यासाठी, व्यक्तींना सक्षम बनवण्यासाठी आणि शाश्वत आर्थिक विकास सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे.*

मुख्य शब्द : वित्तीय साक्षरता, भारतीय रिझर्व्ह बँक, बँकिंग जागरूकता, आर्थिक समावेशन, चलन व्यवस्थापन.

## प्रस्तावना

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्राचीन काळापासून ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध राहिला आहे. जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा आणि वेरूळ यांसारखी लेणी, पितळखोरे, तसेच बीबी का मकबरा यांसारखी अनेक पर्यटन स्थळे या जिल्ह्याच्या प्राचीन वैभवाची साक्ष देतात. ऐतिहासिक महत्वासोबतच आज हा जिल्हा शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास आला असून शेती, लघु-मध्यम उद्योग, व्यापार आणि दळणवळण क्षेत्रातील विस्तारामुळे येथे वेगाने विकास होत आहे[१].

छत्रपती संभाजीनगर जिल्हा ऐतिहासिक आणि शैक्षणिकदृष्ट्या प्रगत असला, तरी आर्थिक स्तरावर येथे मोठ्या प्रमाणात विविधता दिसून येते. विशेषतः अनुसूचित जातीच्या घटकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत असले, तरी आर्थिक संसाधने आणि बँकिंग सेवांच्या मर्यादित उपलब्धतेमुळे त्यांची वित्तीय साक्षरता तुलनेने कमी असल्याचे आढळते. वित्तीय साक्षरतेच्या अभावामुळे बचत, कर्ज, विमा आणि गुंतवणूक यांसारख्या महत्त्वाच्या आर्थिक निर्णयांमध्ये अनेकदा त्रुटी राहतात, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक प्रगतीवर होतो.याच पार्श्वभूमीवर, 'छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वित्तीय साक्षरतेच्या परिप्रेक्ष्यात अनुसूचित जातीची स्थिती' हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये अनुसूचित जातीतील व्यक्तींची आर्थिक स्थिती, त्यांचे बँकिंगविषयक ज्ञान, बचतीच्या सवयी, गुंतवणुकीबद्दलची समज, आर्थिक नियोजन आणि वित्तीय फसवणुकीपासून संरक्षण मिळवण्यासाठीची जागरूकता या बाबींचा प्रामुख्याने ऊहापोह करण्यात आला आहे.

## तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक माहिती प्राथमिक आणि द्वितीयक अशा दोन्ही स्रोतांतून संकलित करण्यात आली आहे: प्राथमिक तथ्ये: संशोधकाने प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्याद्वारे माहिती संकलित केली आहे. यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एकूण ३६० उत्तरदात्यांची नमुना निवड करण्यात आली. त्यांच्याकडून संरचित प्रश्नावलीच्या माध्यमातून वित्तीय साक्षरतेशी संबंधित सविस्तर माहिती मिळवण्यात आली. द्वितीयक तथ्ये: संशोधनाचा सैद्धांतिक पाया मजबूत करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, सरकारी अहवाल (उदा. जनगणना अहवाल २०११), बँकिंग अहवाल, साप्ताहिके आणि इंटरनेटवरील अधिकृत संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

भारतातील बँकिंग क्षेत्रावरील नियंत्रण आणि नियामक यंत्रणा: बँकिंग व्यवस्था ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा मानली जाते, कारण सक्षम बँकिंग प्रणालीशिवाय आधुनिक अर्थव्यवस्थेच्या विकासाची कल्पना करणे अशक्य आहे.देशाचा सर्वांगीण विकास, गुंतवणुकीला चालना आणि सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यामध्ये बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.मात्र, ही वित्तीय व्यवस्था पारदर्शकपणे चालवण्यासाठी आणि आर्थिक

अनियमितता रोखण्यासाठी या संस्थांवर सशक्त नियामक नियंत्रण असणे अनिवार्य आहे.याच उद्देशाने, भारतात 'भारतीय रिझर्व्ह बँक' ही केंद्रीय बँक म्हणून कार्य करते, जिच्या नियंत्रणाखाली देशातील सर्व राष्ट्रीयीकृत, खाजगी, सहकारी तसेच प्रादेशिक ग्रामीण बँकांचा समावेश होतो[2].

प्रस्तुत संशोधनामध्ये याच पार्श्वभूमीवर बँकांवरील नियामक यंत्रणा आणि रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

तक्ता-1: बँकांवरील नियामक नियंत्रणाबाबत उत्तरदात्यांचे मत

| नियामक संस्था / नियंत्रण | वारवारता | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) | १६३ | ४५.३ |
| केंद्र सरकार | ५६ | १५.६ |
| राज्य सरकार | ३४ | ९.४ |
| माहिती नाही | १०७ | २९.७ |
| एकूण | ३६० | १००.० |

वरील सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, बँकांवर 'भारतीय रिझर्व्ह बँकेचे' नियंत्रण असते, असे मानणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे१६३ (४५.३%) आहे. भारतीय रिझर्व्ह बँक ही 'बँकांची बँक' म्हणून महत्वाची भूमिका पार पाडते. देशातील सर्व बँकांना पतपुरवठा करणे, पतधोरण ठरवणे आणि बँकिंग व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही रिझर्व्ह बँकेची मुख्य कार्ये आहेत.दुसरीकडे, ५६ (१५.६%) उत्तरदात्यांच्या मते केंद्र सरकार बँकांवर नियंत्रण ठेवते. यावरून असे स्पष्ट होते की, अनेक उत्तरदात्यांमध्ये केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्या कार्याबद्दल संभ्रम आहे. जरी केंद्र सरकारला 'बँकिंग नियमन कायदा, १९४९' मधीलकलम ७नुसार सार्वजनिक हितासाठी रिझर्व्ह बँकेला निर्देश देण्याचे अधिकार असले, तरी बँकांचे दैनंदिन नियमन आणि तांत्रिक नियंत्रण हे प्रामुख्याने रिझर्व्ह बँकेमार्फतच केले जाते.राज्य सरकार बँकांचे नियंत्रण करते, असे मानणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण३४ (९.४%) आढळले. विशेषतः सहकारी बँकांच्या संदर्भात हा समज असू शकतो. मात्र, सर्वात चिंताजनक बाब म्हणजे१०७ (२९.७%) उत्तरदात्यांना बँकांवर कोणाचे नियंत्रण असते, याबद्दल कोणतीही माहिती नाही. जवळपास ३० टक्के लोकांमध्ये असलेला हा अज्ञानपणा वित्तीय साक्षरतेच्या दृष्टीने गंभीर आहे.

बँका आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यातील परस्पर संबंध: भारतीय रिझर्व्ह बँक ही देशाची मध्यवर्ती बँक असून ती संपूर्ण बँकिंग व्यवस्थेचे नियमन करणारी सर्वोच्च 'पालक संस्था' म्हणून कार्य करते. रिझर्व्ह बँक आणि इतर बँकांमधील नाते हे एखाद्या मार्गदर्शक आणि शिस्तप्रिय नियंत्रकासारखे असते. ज्याप्रमाणे शाळेत मुख्याध्यापक संपूर्ण शाळेची शिस्त, नियम आणि शैक्षणिक धोरणे ठरवतात, त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँक देशातील सर्व बँकांसाठी कामकाजाची नियमावली आखून देते आणि त्यांचे काटेकोर पालन होईल याची खातरजमा करते. व्यापारी बँकांना आपला ठराविक निधी रिझर्व्ह बँकेकडे ठेवावा लागतो आणि अडचणीच्या काळात रिझर्व्ह बँक या बँकांना आर्थिक आधार देते, म्हणूनच तिला 'बँकांची बँक' आणि 'अंतिम ऋणदाता' असे म्हटले जाते. लोकांच्या कष्टाचा पैसा बँकांमध्ये सुरक्षित राहावा यासाठी रिझर्व्ह बँक बँकांच्या व्यवहारांवर बारीक लक्ष ठेवून आर्थिक शिस्त राखते[3].

थोडक्यात सांगायचे तर, रिझर्व्ह बँक ही मार्गदर्शकाच्या भूमिकेतून बँकांना दिशा दाखवते आणि बँका त्या सूचनेनुसार कार्य करून देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देतात.




आलेख-१: बँका आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यातील संबंधांबाबतचे विश्लेषण

बँका आणि भारतीय रिझर्व्ह यांच्यातील नियामक संबंधांबाबत उत्तरदात्यांच्या प्रतिसादावरून असे दिसून आले की, 'RBI सर्व बँकांचे नियमन करते' असे मानणाऱ्यांचे प्रमाण ४१.१% आहे, जे काही प्रमाणात समाधानकारक जागरूकता दर्शवते. मात्र, 'RBI केवळ सरकारी बँकांचेच नियमन करते' असे मानणारे २५.६% उत्तरदाते आढळले, ज्यावरून नियामक संरचनेबाबत असलेल्या अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीचे दर्शन घडते. विशेषतः, ३३.३% उत्तरदात्यांना या संबंधांविषयी कोणतीही माहिती नसल्याचे समोर आले असून ही बाब वित्तीय साक्षरतेतील मोठी तफावत अधोरेखित करते. यावरून असे स्पष्ट होते की, जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येला रिझर्व्ह बँकेच्या पूर्ण कार्यभाराची अजूनही पुरेशी जाण नाही. ही तफावत भरून काढण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि समाजमाध्यमांच्या प्रभावी वापराद्वारे आर्थिक साक्षरता व आर्थिक समावेशनावर भर देणे गरजेचे आहे, जेणेकरून प्रत्येक नागरिक आपल्या आर्थिक हक्कांप्रती आणि व्यवस्थेप्रती जागरूक राहील.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अंतर्गत विविध बँकिंग उपक्रम: भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिरता राखणे, बँकिंग व्यवहार सुरळीतपणे पार पाडणे आणि वित्तीय प्रणालीवर सर्वसामान्यांचा विश्वास टिकवून ठेवणे, यांमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेची भूमिका अत्यंत कळीची आहे. रिझर्व्ह बँक केवळ चलन निर्मितीचे कार्य करत नाही, तर संपूर्ण बँकिंग क्षेत्रावर देखरेख ठेवून नियमावली तयार करण्याचे आणि त्यांचे काटेकोर नियमन व नियंत्रण करण्याचे सर्वोच्च कार्य करते. या मध्यवर्ती बँकेच्या अंतर्गत पतधोरण निश्चित करणे, चलन व्यवस्थापन, बँकांना परवाने देणे आणि आर्थिक समावेशनासारखे विविध महत्वपूर्ण बँकिंग उपक्रम राबवले जातात[4].

प्रस्तुत अभ्यासामध्ये, जिल्ह्यातील रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार राबवल्या जाणाऱ्या विविध बँकिंग उपक्रमांच्या सद्यस्थितीचे विश्लेषण केले असता, बँकिंग व्यवस्थेच्या स्थानिक कार्यक्षमतेवर प्रकाश टाकणारी महत्वपूर्ण माहिती समोर आली आहे.

तक्ता-२: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अंतर्गत उपक्रमांच्या हितीबाबतची स्थिती

| प्रतिसाद (माहिती आहे का?) | वारवारता | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| होय | १८९ | ५२.५ |
| नाही | १७१ | ४७.५ |

| | | |
|---|---|---|
| एकूण | ३६० | १००.० |

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध उपक्रमांबाबत उत्तरदात्यांच्या माहितीची सद्यस्थिती पाहता, १८९ (५२.५%) उत्तरदात्यांनी आपल्याला या उपक्रमांची माहिती असल्याचे सकारात्मकरीत्या नमूद केले आहे. मात्र, याउलट १७१ (४७.५%) उत्तरदात्यांना या महत्त्वाच्या उपक्रमांविषयी कोणतीही माहिती नसल्याचे निष्पन्न झाले आहे. या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, अनेक उत्तरदात्यांना संबंधित माहिती सहजपणे उपलब्ध होत नाही किंवा तांत्रिक स्वरूपामुळे ती समजून घेणे कठीण जाते. तसेच, इंटरनेट सेवांचा वापर आणि त्यावरील माहितीचे आकलन करण्यात येणाऱ्या अडचणींमुळे देखील माहितीच्या प्रसारात अडथळे निर्माण होत असल्याचे दिसून येते. याव्यतिरिक्त, बँका आणि शासन स्तरावरून ही माहिती जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात येत असलेल्या मर्यादांमुळे मोठ्या प्रमाणावर लोक या उपक्रमांपासून अनभिज्ञ आहेत. त्यामुळे, रिझर्व्ह बँकेचे हे जनहितार्थ उपक्रम व्यापक स्तरावर पोहोचवण्यासाठी अधिक जोमाने आणि प्रभावीरीत्या प्रयत्न करण्याची गरज असल्याचे या निष्कर्षातून स्पष्ट होते.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणांबाबत माहिती: भारतीय अर्थव्यवस्थेचे नियमन, रुपयाचे मूल्य स्थिरीकरण आणि महागाईवर नियंत्रण ठेवणे, यांमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. रिझर्व्ह बँक केवळ चलन निर्मिती करत नाही, तर संपूर्ण बँकिंग प्रणालीवर देखरेख ठेवून सर्वसामान्य नागरिकांना बँकिंग सेवा सुलभतेने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पार पाडते. रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरणांचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या दैनंदिन खर्चावर, बचतीवर आणि कर्जाच्या व्याजावर होत असतो. उदाहरणार्थ, जेव्हा रिझर्व्ह बँक 'रेपो रेट'मध्येवाढ करते, तेव्हा बँकांचे कर्ज महाग होऊन बाजारातील पतपुरवठा मर्यादित होतो, तर रेपो रेट कमी केल्यास कर्ज स्वस्त होऊन आर्थिक हालचालींना वेग मिळतो. तसेच, ठेवींवरील व्याजदर वाढवून बँक बचतीला प्रोत्साहन देते आणि बाजारातील रोखता नियंत्रित करते. एखादी बँक आर्थिक अडचणीत असताना तिला आधार देण्यापासून ते डिजिटल पेमेंट व्यवस्थेपर्यंत रिझर्व्ह बँक अर्थव्यवस्थेच्या 'पालकाची' भूमिका बजावते[७].
प्रस्तुत अभ्यासामध्ये, जिल्ह्यातील नागरिकांची रिझर्व्ह बँकेच्या या विविध धोरणांविषयीची जागरूकता आणि त्यांच्या आर्थिक जीवनावरील परिणामांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

तक्ता-३: भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध धोरणांबाबत उत्तरदात्यांची जागरूकता

| बँकेचे धोरण | वारवारता | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| बँक दर | १०४ | २८.९ |
| चलन व्यवस्थापन | ११५ | ३१.९ |
| वित्तीय समावेशन | ४० | ११.१ |
| डिजिटल चलन | १७ | ४.७ |
| काहीही माहिती नाही | ८४ | २३.३ |
| एकूण | ३६० | १००.० |

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध धोरणांबाबत उत्तरदात्यांच्या प्रतिसादाचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, १०४ (२८.९%) उत्तरदात्यांना 'बँक दर' धोरणाविषयी माहिती आहे, ज्यावरून व्याजदरातील बदलांचा कर्ज आणि गुंतवणुकीवर होणाऱ्या परिणामांबाबतची प्राथमिक समज स्पष्ट होते. चलन व्यवस्थापनाबाबत ११५ (३१.९%) उत्तरदात्यांमध्ये जागरूकता आढळली, जी महागाई नियंत्रण आणि चलनविषयक निर्णयांच्या आकलनाबाबतची सकारात्मक स्थिती दर्शवते. मात्र, वित्तीय समावेशन (११.१%) आणि डिजिटल चलन (४.७%) यांसारख्या आधुनिक वित्तीय संकल्पनांबाबत उत्तरदात्यांचे ज्ञान अत्यंत मर्यादित असल्याचे दिसून आले, जे बदलत्या आर्थिक प्रणालीतील नवीन उपक्रमांच्या प्रसारातील उणीव अधोरेखित करते. विशेषतः, ८४ (२३.३%) उत्तरदात्यांना कोणत्याही धोरणाची माहिती नसल्याचे समोर आले आहे, ही बाब वित्तीय साक्षरतेतील मोठी तफावत दर्शवणारी आहे. यावरून जिल्ह्यात आधुनिक वित्तीय सेवा आणि रिझर्व्ह बँकेच्या तांत्रिक धोरणांबाबत व्यापक स्तरावर जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते.

वित्तीय साक्षरतेचे आकलन: वित्तीय साक्षरता म्हणजे केवळ आर्थिक संज्ञांची माहिती असणे नव्हे, तर आपण करत असलेले आर्थिक व्यवहार किती विचारपूर्वक आणि विवेकपूर्ण आहेत, याची जाणीव असणे होय. दैनंदिन जीवनात पैसे कमावणे, खर्च करणे, बचत करणे आणि प्रसंगी कर्ज घेणे यांसारखे निर्णय किती प्रभावीपणे घेतले जातात, यावर व्यक्तीची वित्तीय साक्षरता अवलंबून असते. आर्थिक कौशल्यांचा वापर करून पैशांचे योग्य नियोजन करणे, जसे की अंदाजपत्रक (Budget) तयार करणे, बचतीचे महत्त्व समजणे, विविध गुंतवणूक पर्यायांचे आकलन करणे आणि कर्ज व विम्याचे योग्य व्यवस्थापन करणे, या क्षमतांचा विकास म्हणजे वित्तीय साक्षरता होय. या ज्ञानामुळे केवळ आर्थिक स्थैर्य प्राप्त होत नाही, तर संभाव्य आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचा बचाव करणे आणि भविष्य सुरक्षित करणे शक्य होते[८].
प्रस्तुत अभ्यासामध्ये, जिल्ह्यातील नागरिकांना वित्तीय साक्षरतेचा अर्थ नेमका किती प्रमाणात समजला आहे आणि त्यांच्या प्रत्यक्ष आर्थिक वर्तनावर त्याचा काय परिणाम होतो, या सद्यस्थितीचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

तक्ता-४: वित्तीय साक्षरता' संकल्पनेच्या आकलनाबाबतची स्थिती

| प्रतिसादाचा प्रकार | वारवारता | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| वित्तीय साक्षरता माहिती आहे | १२६ | ३५.० |
| वित्तीय साक्षरता माहिती नाही | १६१ | ४४.७ |
| ऐकले आहे, पण नीट माहिती नाही | ७३ | २०.३ |
| एकूण | ३६० | १००.० |

जिल्ह्यातील उत्तरदात्यांच्या प्रतिसादावरून असे दिसून आले की, केवळ १२६ (३५%) उत्तरदात्यांना 'वित्तीय साक्षरता' या संकल्पनेची नेमकी माहिती आहे. याउलट, १६१ (४४.७%) उत्तरदात्यांनी आपल्याला या विषयाची अजिबात माहिती नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच, ७३ (२०.३%) उत्तरदात्यांनी हा शब्द ऐकला असला तरी त्यांना त्यातील तांत्रिक बाबींचे किंवा स्वरूपाचे स्पष्ट ज्ञान नाही. या आकडेवारीचे एकत्रित विश्लेषण केले असता असे निष्पन्न होते की, सुमारे ६५% पेक्षा अधिक उत्तरदात्यांना वित्तीय साक्षरतेविषयी सखोल आणि स्पष्ट माहिती नाही. संशोधनाच्या दृष्टिकोनातून ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, कारण वित्तीय साक्षरतेचा अभाव हा थेट व्यक्तीच्या आर्थिक सवयी, बचत, गुंतवणूक, कर्ज व्यवस्थापन आणि एकूणच आर्थिक निर्णयक्षमतेवर नकारात्मक परिणाम करणारा ठरू शकतो. त्यामुळे, या घटकांमध्ये आर्थिक निर्णयांची गुणवत्ता सुधारण्यासाठी वित्तीय साक्षरतेचा प्रसार करणे ही काळाची गरज असल्याचे या निष्कर्षातून स्पष्ट होते.

वित्तीय साक्षरतेचे घटक: वित्तीय साक्षरतेमध्ये अशा अनेक महत्त्वपूर्ण

घटकांचा समावेश होतो, ज्यांचा अभ्यास करणे व्यक्तीच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक आहे. हे घटक व्यक्तीच्या आर्थिक निर्णयक्षमतेवर थेट प्रभाव टाकतात. उदाहरणार्थ, अंदाजपत्रक तयार केल्यामुळे अनावश्यक खर्चावर नियंत्रण मिळवता येते आणि केवळ जीवनावश्यक वस्तू व सेवांवर खर्च करण्याची शिस्त लागते.बचत केल्यामुळे भविष्यातील आर्थिक गरजांची पूर्तता करणे सोपे जाते, तर योग्यगुंतवणुकीद्वारे) संपत्ती निर्मिती होऊन 'पैशातून पैसा' कमावता येतो.कर्ज व्यवस्थापनाचे कौशल्य अवगत असल्यास कर्जाचा कालावधी, व्याजदर आणि मासिक हप्त्यांचे गणित मांडून कर्जाचा भार कमी करणे शक्य होते, ज्यामुळे अनावश्यक कर्जबाजारीपणा टाळता येतो. तसेच, विमा हा अनपेक्षित संकटांपासून आर्थिक संरक्षण देणारा महत्त्वाचा घटक आहे; योग्य विम्याची निवड केल्यास आरोग्य किंवा अपघातासारख्या प्रसंगी होणारे मोठे आर्थिक नुकसान टाळता येते[७].

थोडक्यात सांगायचे तर, वित्तीय साक्षरतेचे हे विविध घटक समजून घेतल्यामुळे व्यक्ती आपले आर्थिक निर्णय अधिक जबाबदारीने आणि विचारपूर्वक घेऊ शकते.

तक्ता-५: वित्तीय साक्षरतेच्या विविध घटकांबाबत उत्तरदात्यांची जागरूकता

| वित्तीय साक्षरतेचे घटक | वारवारता | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| उत्पन्नाचे नियोजन | १२९ | ३५.८ |
| खर्च व्यवस्थापन | ६६ | १८.३ |
| बचत आणि गुंतवणूक | ४४ | १२.२ |
| कर्जाचे व्यवस्थापन | ४९ | १३.६ |
| विमा व निवृत्ती नियोजन | ३१ | ८.६ |
| वरील सर्व | २३ | ६.४ |
| माहिती नाही | १८ | ५.० |
| एकूण | ३६० | १००.० |

जिल्ह्यातील उत्तरदात्यांच्या वित्तीय साक्षरतेच्या विविध घटकांबाबत माहिती घेतली असता, उत्पन्नाचे नियोजन करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३५.८% आढळले, ज्यावरून आर्थिक नियोजनाची प्राथमिक पातळी लोकांना परिचित असल्याचे दिसून येते. खर्च व्यवस्थापनाबाबत १८.३% उत्तरदात्यांना माहिती असून, बचत आणि गुंतवणुकीबाबत केवळ १२.२% उत्तरदाते जागरूक असल्याचे स्पष्ट झाले. कर्ज व्यवस्थापनाविषयी १३.६% उत्तरदात्यांना माहिती आहे, तर विमा आणि निवृत्ती नियोजनासारख्या भविष्यवेधी घटकांबाबत माहिती असणाऱ्यांचे प्रमाण केवळ ८.६% इतके अत्यल्प आहे. विशेष म्हणजे, वित्तीय साक्षरतेच्या वरील सर्व घटकांची एकत्रित माहिती असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण केवळ ६.४% असून, ५% उत्तरदात्यांना कोणत्याही घटकाची माहिती नसल्याचे निष्पन्न झाले. ही आकडेवारी स्पष्ट करते की, उत्तरदात्यांची वित्तीय साक्षरता प्रामुख्याने उत्पन्न आणि खर्च या तात्कालिक बाबींपुरतीच मर्यादित राहिली आहे; मात्र दीर्घकालीन आर्थिक नियोजन, जोखीम व्यवस्थापन आणि संपत्ती निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या गुंतवणुकीसारख्या व्यापक घटकांबाबतची समज अजूनही अपुरी असल्याचे दिसून येते.

**आर्थिक साक्षरतेची माहिती:** दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी श्रम करून मिळवलेले उत्पन्न, त्यातून होणारा खर्च, शिल्लक राहिलेली बचत आणि गरज भासल्यास घेतलेले कर्ज या संपूर्ण आर्थिक चक्राचे सुयोग्य नियोजन करण्याची कला म्हणजे आर्थिक साक्षरता होय. ही साक्षरता केवळ आकडेमोड नसून पैशांबाबत विवेकपूर्ण विचार करण्याची क्षमता आहे, ज्यामध्ये उत्पन्नाचे स्रोत समजून घेणे, खर्चाचे सुयोग्य व्यवस्थापन करणे, बचतीचे महत्त्व आणि गुंतवणुकीच्या संधींचे आकलन करणे तसेच कर्ज घेताना आवश्यक ती खबरदारी घेणे या बाबींचा समावेश होतो. पैशांच्या योग्य हाताळणीची ही शास्त्रोक्त पद्धत माहिती असणे व्यक्तीच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत गरजेचे आहे, कारण आर्थिक साक्षरतेमुळे जीवनाला एक नवी आणि सुरक्षित दिशा प्राप्त होऊन भविष्य सुरक्षित होते[८].

प्रस्तुत अभ्यासामध्ये, जिल्ह्यातील नागरिकांना आर्थिक साक्षरतेची माहिती किती प्रमाणात उपलब्ध आहे आणि त्यांच्या आर्थिक निर्णयक्षमतेवर त्याचा काय परिणाम होतो, या सद्यस्थितीचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

तक्ता-६: आर्थिक साक्षरतेची माहिती मिळविण्याचे विविध स्रोत

| माहिती मिळविण्याचे स्रोत | वारवारता | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| शाळा / महाविद्यालय | ८१ | २२.५ |
| बँका / वित्तीय संस्था | १०४ | २८.९ |
| सामाजिक माध्यम (Social Media) | ३८ | १०.६ |
| मित्र / नातेवाईक | ३७ | १०.३ |
| स्वयअध्ययन (Self-study) | ७४ | २०.६ |
| माहिती मिळत नाही | २६ | ७.२ |
| एकूण | ३६० | १००.० |

जिल्ह्यातील उत्तरदात्यांना आर्थिक साक्षरतेची माहिती नेमकी कुठून मिळते, यावर प्रकाश टाकला असता ८१ (२२.५%) उत्तरदात्यांनी शाळा किंवा महाविद्यालयांचे नाव नमूद केले असून, यावरून शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते; मात्र ही व्याप्ती अजूनही सर्वसमावेशक झालेली नाही. सर्वाधिक १०४ (२८.९%) उत्तरदात्यांना बँका आणि वित्तीय संस्थांकडून माहिती प्राप्त होत असून, औपचारिक वित्तीय यंत्रणा जनजागृतीमध्ये मोठी भूमिका बजावत असल्याचे यावरून सिद्ध होते. सामाजिक माध्यमाद्वारे माहिती मिळविणाऱ्यांचे प्रमाण ३८ (१०.६%) असून, मित्र किंवा नातेवाईकांकडून माहिती मिळविणारे उत्तरदाते ३७ (१०.३%) आढळले; या अनौपचारिक स्त्रोतांकडून मिळणारी माहिती महत्त्वाची असली तरी तिची अचूकता आणि विश्वसनीयता तपासणे आवश्यक असल्याचे अधोरेखित होते. विशेष म्हणजे, ७४ (२०.६%) उत्तरदाते 'स्वयंअध्ययनाद्वारे' माहिती मिळवत असल्याचे दिसून आले, जे डिजिटल माध्यमांच्या आणि वाचन साहित्याच्या वाढत्या वापराचे निदर्शक आहे. तथापि, २६ (७.२%) उत्तरदात्यांना कोणत्याही माध्यमातून माहिती मिळत नसल्याचे समोर आले असून, ही बाब आर्थिक समावेशनाच्या चिंताजनक आहे.

**वित्तीय साक्षरता वृद्धीसाठी उपाययोजना:** संशोधनाअंती प्राप्त झालेल्या निष्कर्षांच्या आधारावर, जिल्ह्यातील वित्तीय साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी खालील उपाययोजना सुचविण्यात येत आहेत:

शैक्षणिक संस्थांचा सहभाग: विशेषतः वाणिज्य महाविद्यालयांनी शहरी व निमशहरी भागांत वित्तीय साक्षरता आणि आर्थिक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी विशेष शिबिरे, तज्ज्ञांची व्याख्याने आणि कार्यशाळांचे नियमित आयोजन करावे.

सर्वसमावेशक आर्थिक शिक्षण: शहरी व ग्रामीण वस्तीमधील सर्व

स्तरांतील नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना दैनंदिन अर्थव्यवहारांचे, बचतीचे आणि गुंतवणुकीचे प्राथमिक शिक्षण सोप्या भाषेत उपलब्ध करून द्यावे.

कौटुंबिक स्तरावर संस्कार: वित्तीय साक्षरतेची मुळे भक्कम करण्यासाठी कुटुंबप्रमुखांनी पाल्यांना लहानपणापासूनच पैशांचे महत्त्व, बचतीची सवय आणि मर्यादित खर्चाचे आर्थिक संस्कार देणे आवश्यक आहे.
मार्गदर्शक साहित्याची निर्मिती: महाविद्यालयांनी वित्तीय साक्षरते विषयी जनजागृती करण्यासाठी माहितीपूर्ण पुस्तिका आणि व्यावहारिक सूचना देणाऱ्या मार्गदर्शिका प्रकाशित करून त्या नागरिकांमध्ये प्रसारित कराव्यात.

विमा जागरूकता: विम्याचे महत्त्व केवळ जोखीम व्यवस्थापन म्हणून न पाहता, ते सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी भविष्यातील आर्थिक सुरक्षा कवच कसे ठरू शकते, याबाबत व्यापक स्तरावर जनजागृती करावी.

सार्वजनिक ठिकाणी प्रसार: बँकांनी नागरिक आणि ग्राहकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी बँकेच्या परिसरासह बस स्थानके, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक ठिकाणी माहितीपूर्ण भित्तीपत्रके (Posters) लावून बँकिंग सेवांचा प्रचार करावा.

संस्थात्मक समन्वय: समाजसेवेचे कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था, जनहितार्थ मंडळे आणि अशासकीय संस्थांनी (NGOs) एकत्र येऊन वित्तीय जागृतीसाठी सामूहिक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

बँक कर्मचाऱ्यांची भूमिका: बँकेत येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला, विशेषतः ग्रामीण व कमी साक्षर ग्राहकांना, खात्यातील व्यवहार आणि विविध बँकिंग सेवांबाबत कर्मचाऱ्यांनी समाधानकारक व सुलभ माहिती देऊन सहकार्य करावे.

माध्यमांचा प्रभावी वापर: माहितीच्या प्रसारासाठी केवळ औपचारिक पद्धतींवर अवलंबून न राहता, लोकप्रिय सामाजिक माध्यमे आणि डिजिटल साधनांचा कल्पक व प्रभावी वापर करून वित्तीय साक्षरतेचा संदेश तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवावा.

## निष्कर्ष

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जिल्ह्यातील नागरिकांच्या वित्तीय साक्षरतेचा स्तर आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध धोरणांबाबत असलेल्या जागरूकतेचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यासासाठी एकूण ३६० उत्तरदात्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, त्यातून प्राप्त सांख्यिकीय माहितीनुसार काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत. बँकिंग आणि नियामक व्यवस्थेचा विचार करता, सुमारे ४१.१% उत्तरदात्यांना रिझर्व्ह बँकेच्या नियामक भूमिकेची योग्य माहिती आहे, तर ३३.३% लोक या प्रक्रियेबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विविध उपक्रमांची ५२.५% लोकांना माहिती असली, तरी तांत्रिक गुंतागुंतीमुळे ४७.५% उत्तरदात्यांमध्ये माहितीचा अभाव दिसून येतो. धोरणांच्या बाबतीत उत्तरदाते 'चलन व्यवस्थापन' (३१.९%) आणि 'बँक दर' (२८.९%) यांसारख्या पारंपरिक कार्यांबाबत अधिक जागरूक आहेत, मात्र 'डिजिटल चलन' (४.७%) आणि 'वित्तीय समावेशन' (११.१%) या आधुनिक संकल्पनांची माहिती अत्यंत मर्यादित आहे.'वित्तीय साक्षरता' या मूळ संकल्पनेचे स्पष्ट आकलन केवळ ३५% उत्तरदात्यांना आहे. उत्तरदात्यांची आर्थिक साक्षरता प्रामुख्याने 'उत्पन्न नियोजन' (३५.८%) आणि 'खर्च व्यवस्थापनापुरती' (१८.३%) मर्यादित असून, 'गुंतवणूक, विमा आणि निवृत्ती नियोजना'सारख्या दीर्घकालीन घटकांकडे दुर्लक्ष होत असल्याचे आढळले. माहितीच्या स्त्रोतांमध्ये बँका (२८.९%) आणि शैक्षणिक संस्था (२२.५%) यांची भूमिका अग्रगण्य आहे.

अंतिम निष्कर्षानुसार, नागरिकांमध्ये प्राथमिक आर्थिक व्यवहारांची समज असली तरी, आधुनिक वित्तीय सेवा आणि रिझर्व्ह बँकेच्या तांत्रिक धोरणांबाबत 'माहितीची मोठी दरी' आहे. ही तफावत दूर करण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि बँकांद्वारे विशेष जनजागृती मोहिमा राबविण्याची नितांत गरज असल्याचे हा अभ्यास अधोरेखित करतो.

## संदर्भसूची


1. Directorate of Economics and Statistics (2025). District Social and Economic Review: District Chhatrapati Sambhajinagar. Planning Department, Government of Maharashtra
2. Reserve Bank of India (2026). Department of Banking Supervision.
3. National Judicial Academy (2017). Reserve Bank of India & banks: Monitor, mentor & regulator.
4. Ministry of Finance (2022). Awareness on safe digital banking (Lok Sabha Unstarred Question No. 116). Digital Sansad, Parliament of India.
5. Press Information Bureau (2025). RBI issues June 2025 monetary policy update (Explainer ID: 154573). Ministry of Finance, Government of India.
6. Agarwal T. (2016). Twin pillars of Indian banking: Financial literacy and financial inclusion. *SIES Journal of Management*, 12(2), 52–60.
7. Hogarth J. M. and Hilgert M. A. (2002). Financial knowledge, experience and learning preferences: Preliminary results from a new survey on financial literacy. *Consumer interest annual*, 48(1), 1-7.
8. Chouhan P. (2013). A study on literacy and educational attainment of scheduled castes population in Maldah District of West Bengal, India. *Journal of Geography and Regional Planning*, 6(1), 19.
9. Gupta K. and Kaur J. (2014). A study of financial literacy among micro entrepreneurs in district Kangra. *International journal of research in business management*, 2(2), 63-70.
10. Hung A., Parker A. M. and Yoong J. (2009). Defining and measuring financial literacy.
11. Sanjay Kapadnis and Kushal Pakhale (2024). Financial Literacy and Financial Inclusion. Sakal Publication, p. 10
12. Arth Shikshan (2021). Introduction to banking.

**13.** School Education. (2025). Maratha reservation Hyderabad Gazette implementation Government Resolution (GR).

**14.** Maharashtra State Marathi Vishwakosh Production Board (2021). Bank and Banking. Marathi Vishwakosh.

**15.** Reserve Bank of India (2021). Financial education.

**16.** Samantha Rose (2023). The History of Financial Literacy.